सदर अर्ज प्रतिवादी क्र.३ विरोधात झालेला ‘उलटतपास नाही’ आदेश रद्द करणेसाठी आहे.

०२. अर्ज व म्हणणे तसेच प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०३. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी क्र.३ ने दि. ०५/०३/२०१६ रोजी पुराव्याचे शपथपत्र दिलेले आहे. त्याकामी प्रतिवादीचा उलटतपास बाकी होता. दरम्यान कोव्हीड–१९ च्या आजाराची साथ पुर्ण देशात सुरु झालेली होती. त्यामुळे अर्जदार प्रतिवादी क्र.३ हा उलटतपासासाठी नाशिक येथुन न्यायालयात हजर राहु शकला नाही म्हणुन दि.३०/०९/२०२१ रोजी प्रतिवादीचा पुरावा बंद केलेला आहे व प्रतिवादीचा पुरावा वादी विरोधात वाचता येणार नाही असा हुकुम केलेला आहे. प्रतिवादीस संधी न मिळाल्यास त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. न्यायालयासमोर सत्य परिस्थिती येवुन न्यायदान करणे सोपे होईल. शेवटी झालेला हुकुम रद्द करुन पुरावा देणेची संधी मिळणेकरीता विनंती केली.

०४. समोरील बाजुचे थोडक्यात कथन असे की, अर्ज खोटा, बनावट व लबाडीचा आहे. दावा वादमिळकतीतील वादी व प्रतिवादी यांचा हिस्सा विभक्त करुन मिळणेकरीता आहे. प्रतिवादीने नि.क्र.२१ नुसार लेखी कैफीयत देवुन वादमिळकत एकत्र कुटुंबाचे असल्याचे मान्य केलेले आहे. केवळ औपचारीकता म्हणुन प्रतिवादीने नि.क्र.४७ वर पुरावा दिलेला आहे. वादी उलटतपास घेण्यास तयार असतांना प्रतिवादी सातत्याने गैरहजर राहीला म्हणुन दि.३०/०९/२०२१ रोजी आदेश झालेला आहे. दावा अंतीम युक्तीवादासाठी नेमलेला असतांना दाव्याचे कामकाज लांबणीवर पडावे म्हणुन अर्ज दिलेला आहे. शेवटी अर्ज खर्चासह मंजुर करणेची विनंती केली.

०५. प्रकरणाचे अवलोकन केले असता दि.३०/०९/२०२१ रोजी वादी अथवा प्रतिवादी दोन्ही बाजुंनी कोणीही हजर नव्हते. अशा परिस्थितीमध्ये दाव्यात

प्रगती होणेकरीता प्रतिवादीचा पुरावा बंद झालेबाबत व त्याला उलटतपास न झाल्याने तो वाचला जाणार नाही म्हणुन नि.क्र.०१ खाली आदेश करण्यात आला. त्यानंतर दि.२६/०४/२०२२ ला सदर अर्ज दाखल केलेला आहे. दिनांक ३०/०९/२०२१ चे पुर्वीचे रोजनामे पाहता दि.०७/०३/२०२० पासुन वादी—प्रतिवादी पैकी कोणीही हजर नव्हते. दावा वडीलोपार्जीत शेतजमीनीचे वाटपाकरीता आहे. वादमुद्दे पाहता वाटप झालेबाबत बचाव आहे. अशा परिस्थितीमध्ये दावा पुर्णपणे गुणवत्तेवर कायमस्वरुपी निकाली होणेकरीता प्रतिवादीस समोरील बाजुस खर्च देणेवर संधी देणे न्याय व योग्य दिसुन येते, करीता खालील आदेश.

## <u>आदेश</u>

१. अर्ज समोरील बाजुस रुपये १,०००/— (एक हजार रुपये फक्त) खर्च देणेवर मंजुर करणेत येतो.

२. प्रतिवादीं यापुढे कोणतीही मुदतवाढ अर्थात प्रकरण तहकुबीची विनंती न करता त्यांचा पुरावा पुर्ण करतील.

३. पुढील तारीख अथवा त्यापुर्वी खर्चाबाबत पुर्तता न केल्यास अर्ज नामंजुर समजण्यात येतो.

स्वाक्षरीत/—
(श.गि. दुबाले)
दि.न्या.क.स्तर, नांदगाव

दि. ०६/०६/२०२२